ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# कौशल्य विकास कार्यक्रम

**प्रा. निलम हेडाऊ**
(अशंकालीन प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग)
कमला नेहरु महाविद्यालय, सक्करदरा, नागपूर

सारांश :

कार्यक्षमतेने व यशस्वीरीत्या जीवन जगता यावे यासाठी व्यक्तीमध्ये अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न करणे फार गरजेचे आहे. व्यक्तीचे कौशल्य विकसित करण्याचा सूकर असा मार्ग जर व्यक्तीला प्राप्त झाला तर अवकाशाला देखील भिडण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये निर्माण होऊ शकते. आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कौशल्य व ज्ञान हया दोन प्रेरक शक्ती आहे. त्यामुळे हया शक्तीचा विकास करणे फार गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीना काही कौशल्य अंतर्भूत असतात परंतु त्या कौशल्याला योग्य दिशा मिळवुन मोजक्याच लोकांना जीवनात सफलता प्राप्त होत असते. परंतु असे का होते? व्यक्तीमध्ये कौशल्य व ज्ञान असूनही त्या जिवनामध्ये यशस्वी का होऊ शकत नाही? हे जाणून घेण्यासाठी कौशल्य विकास योजनेची आधूनिक काळात फार मोठ्या प्रमाणात गरज आहे. वर्तमानकाळात देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक स्थितीमध्ये टिकवून ठेवण्यासाठी सरकारने पूढे येऊन अनेक योजना राबवून समाजातील लोकांच्या कौशल्याचा उच्च स्तर कसा प्राप्त करता येईल जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त करता येईल आणि त्यातून नवीन पिढीला यूवा सशक्तीकरणाची नवीन दिशा मिळण्यास मदत होईल.

**प्रस्तावनाः**

भारतात कुशल कामगाराची गरज आहे. परंतु व्यावसायिक कौशल्याचे प्रशिक्षण देण्याची गती मात्र कमी आहे. राश्ट्रीय कौशल्य धोरण 2015 अनूसार 400 दशलक्ष कामगारांना किंवा अगदी वास्तववादी विचार करायचा तर निदान 200 दशलक्ष कामगारांना 2022 पर्यंत प्रशिक्षणाची गरज आहे. सध्या देशात वर्शाला 5 दशलक्ष कामगारांना प्रशिक्षण दिले जात आहे. हे प्रयत्न वाढविण्याची नितांत गरज आहे.

कौशल्य विकास योजना ही योजना शिक्षणापासून वंचित असणाऱ्या समाजातील लोकांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ह्याा योजनेची स्थापना करण्यात आली. या योजनेअंतर्गत समाजातील लोकांना एक विशेश प्रकारे प्रशिक्षण दिल्या जाते. जेणेकरून भविश्यात ते रोजगार प्राप्त करून व्यक्ती आपल्या पायावर उभे राहण्यास मदत होईल. या योजनेअंतर्गत खास करून युवा वर्गाला प्रशिक्षण देवून त्यांना व्यवसाय स्थापन करण्यासाठी ऋण देण्याची सोय सरकारने उपलब्ध करून दिल्या. या कारणास्तव समाजातील जी युवा पिढी शिक्षणापासून वंचित राहीली आहे अशा युवा वर्गाला रोजगाराची संधी देऊन उदयोगाला चालना देण्याच्या प्रयत्न या योजनेअंतर्गत केला गेलेला आहे. कौशल्य विकास योजनेअंतर्गत कृषींशी संबंधीत उदयोग, ड्रेस डिझाईनिंग, ऑटोमोबाईल, सौंदर्य विषयक इ. प्रकारचे व्यावसायिक शिक्षण दिल्या जातात त्यामुळे युवा पिढीला रोजगार प्राप्त करण्यास चालना मिळते. त्यामुळे समाजातील बेरोजगारीचे प्रमाण दूर करण्यास काही प्रमाणात मदत होते. त्याचबरोबर समाजातील आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते.

**संशोधनाचा उद्देशः**

संशोधनाचा उद्देश समाजातील लोकांमध्ये ज्ञान आणि कौशल्याचा जास्तीत जास्त विकास होण्यासाठी कौशल्य विकास योजना याविषयी जनजागृती निर्माण करणे हा होय.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आलेला असून त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे,

नियतकालीके तसेच संकेतस्थळे इत्यादीचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**कौशल्य विकास कार्यक्रमाची सद्यस्थितीः**

प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीने आपले स्वप्न 'स्किल इंडिया' ला नवी दिल्लीमध्ये ''राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन'' च्या स्वरूपात सुरू केले. ज्यामध्ये स्पश्ट केले आहे की, सरकारची दारिद्रयाच्या विरोधात एक प्रकारची जंग आहे आणि भारतातील प्रत्येक गरीब आणि वंचित युवांना रोजगार प्राप्त करण्याची संधी दिली. या योजनेची घोषणा भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीने 15 जुलै 2015मध्ये आंतरराष्ट्रीय युवा कौशल्य दिवस हया दिवशी केली.

मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी अनेक कार्यक्रमाची सुरूवात केली. ''कौशल्य भारत कुशल भारत'' ची योजना याच योजनेचा एक भाग आहे. या योजनेचा मुख्य उद्देश भारतातील विभिन्न युवा वर्गातील कौशल्याचा विकास करणे आणि रोजगार प्राप्त करण्याचे अवसर प्रदान करणे हे होय. नरेंद्र मोदींच्या मते, ''कौशल्य विकास योजना ही केवळ खिशात पैसे भरणे नसून गरीब व्यक्तींमध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण करणे हे या योजनेचे ध्येय होय. या योजनेअंतर्गत पूढील योजनांचा समावेश करण्यात आला आहे.

1. राष्ट्रीय कौशल्य विकास मिशन
2. कौशल्य विकास आणि उदयोगांसाठी राष्ट्रीय धोरण
3. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना
4. कौशल्य ऋण योजना.

कोणत्याही देशामध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कौशल्य विकास हा महत्वाचा असतो. त्यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमासाठी मुख्यतः युवांवर अधिक जोर दिला जातो. आणि त्या बाबतीत भारत देशाची स्थिती अतिशय अनूकूल आहे. लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा उत्पादक उत्पन्न समूहामध्ये येतो. 2011 च्या जनगणनेनूसार लोकसंख्येचे वयोमानानुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

| वय | लोकसंख्या % |
|---|---|
| 20 वर्षापेक्षा कमी | 41 % |
| 20-59 वर्ष | 50 % |
| 60 वर्षापेक्षा अधिक | 9 % |

(स्त्रोत :www.censusindia.gov.in)

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना अंतर्गत कौशल्य विकास मंत्रालय आणि उदयोगाचा एकूण नामांकनासाठी नवीन माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण कार्यक्रमांअंतर्गत नामांकन संख्या लगभग 19.7 लाख होती. प्रशिक्षण विभागाला दोन वर्गामध्ये विभाजित केल्या गेले. प्रथम प्रशिक्षण केंद्रामध्ये 17.94 लाख लोक तर दुसऱ्या केंद्रामध्ये 1.79 लाख लोक होते. 25 एप्रिल 2016 पर्यंत नवीन आकडेवारी नूसार कौशल्य कार्यक्रम वितरणामध्ये पूढील सहा राज्याचा समोवश होतो.

**कौशल्य कार्यक्रम वितरणातील राज्य**

| अ.क्र. | राज्य | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1. | उत्तरप्रदेश | 2,52,304 |
| 2. | मध्यप्रदेश | 1,56,096 |
| 3. | तामिलनाडू | 1,50,244 |
| 4. | आंध्रप्रदेश | 1,22,866 |
| 5. | पं.बंगाल | 1,13,397 |
| 6. | राजस्थान | 1,11,235 |

*(स्त्रोत :-www.kaushalvikasyojana.com)*

मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिलनाडू, पं.बंगाल, राजस्थान हया राज्यातील एकूण विद्यार्थी 50ः पेक्षा अधिक आहे. 2020 पर्यंत 20 लाख युवा विद्यार्थीचा समावेश होण्याची शक्यता आहे.

**कौशल्य विकास कार्यक्रमाचा उद्देशः-**

1. गरीबीमुळे ज्या युवांना उच्च शिक्षा प्राप्त करण्यापासून वंचीत राहते अशा युवांमधील सुप्त गुणांचा विकास करणे.

2. योजनाबंद मार्गाने गरीब युवांना संगठीत करून त्यांचा कौशल्यांना योग्य दिशेने प्रशिक्षित करून दारिद्रियाचे निमूर्लन करणे.

3. दारिद्रय दूर करण्यासोबतच गरीब कुटूंब तसेच युवांमध्ये नवीन सामर्थ्य निर्माण करून आत्मविश्वास निर्माण करणे तसेच देशात नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा प्रयत्न करणे.

4. सर्व राज्य आणि संघराज्याला संगठित करून ष्प्ष्ज्ष च्या माध्यमातून जगामध्ये स्वतःला स्थापित करणे.

5. कौशल्य विकासाबरोबरच उदयोजकता आणि मूल्य संवर्धनाला प्रोत्साहन देणे.

6. भारतातील 65ः लोकसंख्या ज्यांचे वय 35 वर्शापेक्षा कमी आहे हया युवांना जागतिक स्पर्धेशी सामना करण्यासाठी कौशल्य व संधी प्रदान करणे.

7. येणाऱ्या दशकामध्ये संपूर्ण जगामध्ये कार्यकूशल लोकसंख्येच्या आवश्यकतेची पूर्तता करण्यासाठी जागतिक रोजगार बाजाराचे अध्ययन करून त्यानूसार देशातील युवकांना प्रत्येक क्षेत्रामध्ये आजच कुशल बनविणे.

8. सर्व तांत्रीक संस्थेला जगामध्ये बदलत्या तंत्रानूसार गतिशील बनविणे.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना - युवा सशक्तीकरणाची नवीन दिशा :-**

कोणत्याही देशामध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कौशल्य आणि ज्ञान हया दोन प्रेरक शक्ती आहे की, ज्यामुळे जागतिक स्थितीमध्ये अर्थव्यवस्थेला चालना निर्माण होण्यास मदत होते. कौशल्य विकास कार्यक्रमामध्ये मुख्यतः युवांवर अधिक भर दिल्या आहे. या बाबतीत भारत देशाची स्थिती अतिशय अनूकूल आहे. लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा उत्पादक उत्पन्न समूहामध्ये येतो. ही एक प्रकारची सूवर्ण संधी देशाला मिळाली आहे. परंतु त्याचा लाभ देशाला तेव्हाच मिळेल जेव्हा देशातील युवा पिढी स्वस्थ, शिक्षित व कुशल होईल.

भारतातफार मोठ्या प्रमाणात युवा लोकसंख्या आहे. त्यामुळे भविष्यकाळात सामाजिक आर्थिक विकासाला चालना मिळण्यास मदत होऊ शकते. देशामध्ये 60.5 करोड लोक 25 वर्शापेक्षा कमी वय असलेले आहेत. ते रोजगारासाठी उपयूक्त कौशल्य प्राप्त करून यूवा वर्ग देशामध्ये प्रगती करू शकते. यूवा पिढी आपल्याच पिढीला नव्हे तर भविष्य काळालाही उज्वल करण्यास प्रेरणादायी ठरू शकतील.

सध्या मंजूर झालेली प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना युवांना कौशल्य प्रशिक्षण देणारी एक प्रमुख योजना आहे. हया योजना अंतर्गत पाठयक्रमामध्ये सुधार, चांगले शिक्षण आणि प्रशिक्षित शिक्षकांवर विशेश भर दिला जातो. प्रशिक्षणामध्ये अन्य पैलूंबरोबरच व्यवहार कुशलता आणि व्यवहारामध्ये परिवर्तन ह्यांचा अंतर्भाव होतो. या योजनेअंतर्गत दहावी व बारावी च्या दरम्यान शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले. या योजनेचे क्रियान्वयन NSDC चे प्रशिक्षित लोक आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या संबंधीत संस्थेलाही या योजनेअंतर्गत जोडल्या गेले. त्यासाठी एक मुल्यांकन प्रणाली तयार करण्यात आलेली आहे.

कौशल्य विकास योजने अंतर्गत एक कौशल्य विकास प्रबंधन प्रणाली तयार करण्यात येईल जे सर्व प्रशिक्षण केंद्राचे विवरण, प्रशिक्षण पाठ्याक्रमाच्या गुणवत्तेचे परिक्षण करेल तसेच प्रशिक्षण प्रक्रियेमध्ये बायोमेट्रिक सिस्टम व विडिओ रिकॉर्डिंगचाही समोवश करण्यात येईल. शिकायतकर्त्यासाठी शिकायत निवारण तंत्र सुरू केले तसेच कार्यक्रमाचा प्रचार व प्रसारासाठी ऑनलाईन पोर्टल सुरू केल्या जाईल. एकूण 1120 करोड रू. खर्च करून 14 लाख यूवकांना प्रशिक्षित केल्या जाईल. प्रशिक्षकांसाठी 220 करोड व युवांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी 67 करोड रू. खर्च केल्या जाईल. यासाठी केंद्र व राज्य सरकार, स्थानिक संस्था, पंचायती राज संस्था आणि समूदाय आधारित संस्थांची मदत घेतल्या जाईल. आणि 2022 पर्यंत 50 करोड लोकांना प्रशिक्षणाचे लक्ष्य ठेवल्या गेले आहेत.

**कौशल्य विकासासाठी अर्थपूरवठयाची नवीन व्यवस्था :-**

राष्ट्रीय कौशल्य धोरण 2015 अनूसार 400 दशलक्ष कामगारांना किंवा अगदी वास्तववादी विचार करायचा तर निदान 200 दशलक्ष कामगारांना 2022 पर्यंत प्रशिक्षणाची गरज आहे. सध्या देशात वर्षाला 5 दशलक्ष कामगारांना प्रशिक्षण दिले जात आहे. हे प्रयत्न वाढविण्याची गरज आहे. कौशल्य विकासासाठी निधी मर्यादित असून महसुलाच्या तुलनेत फार कमी खर्च यावर होत आहे. त्यामुळे फार थोडे प्रशिक्षण सामाजिक जबाबदारीतून

दिले जात आहे. 39ः कंपन्या हया उदयोगाधिष्ठित प्रशिक्षण देतात. कौशल्य विकास मंत्रालय इतर मंत्रालयाचा तुलनेत नवीन आहे, त्यांना जागतिक बँकेचे कर्ज मिळाले असले तरी अजून जास्त आर्थिक मदत लागणार आहे. अनेक देशात हा अर्थपूरवठा खाजगी क्षेत्रातून होतो. छैक्ष चा निधी असलेल्या खाजगी संस्था मागणीनुसार प्रशिक्षण देतात ते प्रशिक्षण कमी दर्जाचे असते. सेक्टर स्कील्स कौन्सीलची व्यवस्था असली ती मर्यादीत स्वरूपाची आहे. केंद्रसरकारने त्यासाठी नवीन प्रारूप शोधायला हवे. त्यासाठी कंपन्यांवर कर लावून प्राप्तझालेला निधी प्रशिक्षणासाठी खर्च करण्यात यावा. जगातील 63 देशामध्ये हा पर्याय अवलंबला जात आहे. त्यामध्ये लॅटिन अमेरिकेतील ब्राझीलसह 17 देश सहारन भागात दक्षित आफ्रिकेसह 17 देश, यूरोपमधील 14 देश मध्यपूर्व व उत्तर आफ्रिकेतील 17 देश तसेच आशियातील काही देशांचा समावेश होतो.

**राष्ट्रीय प्रशिक्षण निधीची गरज का आहे?**

कौशल्य प्रशिक्षण देण्याची सध्याची क्षमता फार कमी आहे. पण सध्यस्थितीत ती गरज बनली आहे. I.T.I व NSDC संचालित प्रशिक्षण पूरवठादार यांनी वार्षिक प्रशिक्षण क्षमता वर्शाला 5 दशलक्षापर्यंत आणण्यास मदत केली आहे पण केवळ यातूनच मेक इन इंडियाचे उद्दिष्ट साध्य होणे शक्य नाही. तर देशातील लोकसंख्येचा व युवाशक्तीचा योग्य वापर करून घेण्यासाठी त्यांना प्रशिक्षणाची फार गरज आहे.

देशातील कौशल्य विकासासाठी जास्तीत जास्त महसुल खर्च करावा परंतू तो किती प्रमाणात करावा यालाही मर्यादा पडतात. कारण सरकारवर शिक्षण, आरोग्य, पायाभूत गुंतवणूक यासारख्या अनेक जबाबदाऱ्या आहेत. म्हणून प्रशिक्षणाची जबाबदारी खाजगी क्षेत्राने घेणे आवश्यक आहे. त्यामुळे राष्ट्रीय प्रशिक्षण निधी आवश्यक आहे

1. संघटित व खाजगी क्षेत्रातून उपकर घेणे आवश्यक आहे. परंतु त्यामध्ये केवळ मध्यम व मोठया उदयोगांचाच समावेश करावा.
2. संघटित व असंघटित क्षेत्रातील उदयोग लाभार्थी असावेत.
3. मागणीनूसार प्रशिक्षण कार्यासाठी अर्थपूरवठयाची सोय असायला हवी. त्यामूळे गरीब विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाच्या संधी मिळू शकेल.

**समारोप :**

भारताने जगातील सर्वात जलद गतिने विकास करणाऱ्या अर्थव्यवस्थेचा स्वरूपात ओळख करून घेतली आहे. भारत सरकारने कौशल्य विकास योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत जे गरीब जनता अधिक खर्च करून शिक्षण घेवू शकत नाही अशा यूवा वर्गाला एकत्रित करून त्याच्यामध्ये असलेले कौशल्य ओळखून त्यानूसार त्यांना रोजगार प्रदान करण्यासाठी मार्गदर्शन केल्या जाते. कोणत्याही व्यक्तीला पैसा कमविण्यासाठी व्यक्तीमध्ये योग्यता असणे अत्यंत आवश्यक आहे. त्या योजनेला वाव देण्यासाठी कौशल्य विकास योजना ही सदैव तत्पर असते आणि त्यातून बेरोजगारांना रोजगार प्राप्त होऊन बेरोजगारीचे प्रमाण दूर होण्यास मदत होईल. देशातील गुंतवणूकीचे प्रमाण वाढून उत्पादकतेस चालना मिळेल आणि दारिद्र्याचे प्रमाण कमी होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :**


1. *www.kaushalvikasyojana.com*
2. *लेख- अर्चना दत्ता*
3. *योजना एप्रिल 2017 (विकास समर्पित मासिक)*
4. *http://life-skill-for-india.*